OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

# मराठवाडयातील गढीवाडे : मध्ययुगीन काळाचे प्रतिक

डॉ. नारायण बाबुराव सूर्यवंशी
इतिहास विभागप्रमुख व संशोधन मार्गदर्शक
शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ

सन १९४८ पर्यन्त म्हणजेच हैद्राबादच्या निजाम सत्तेखालून मराठवाडा मुक्त होईपर्यत ग्रामप्रशासन गढीवाड्यातूनच चालवले गेले. आज ही गढी वाड्यातील गतकाळातील वतनदारांचा प्रभाव समाजावर असलेला दिसतो.गढीवाड्याच्या अभ्यासावरुन त्या काळातील मानवी मनोवृत्तीचे व कौटूंबीक परिस्थितिचे, स्त्री जीवनाचे, आर्थिक परिस्थितिचे, वास्तुशास्त्राच्या विकासाचे, भूमितीचे व भौगोलिक ज्ञानाचे दर्शन घडते.

जगभरात कमी अधिक काळाच्या फरकाने गढ्या उभारल्याची उदाहरणे आपणास दिसून येतात. युरोपात विशेषतः फ्रान्समध्ये सरंमजामदार भव्यदिव्य अश्या गढ्या उभारल्याचे इतिहासावरून स्पष्ट होते. याच न्यायाने मराठवाड्यातही मध्ययुगीन काळात स्थानिक अधिकाऱ्यांनी अथवा वतनदारांनी आप आपल्या ऐपतीनुसार व हुद्यानुसार गढी वाडे उभारल्याचे दिसते.

गढी :-

गढी हा शब्द लहान किल्ल्यासाठी वापरला जातो[१] किंवा बुरुज असलेला पण खंदक नसलेला भुईकोट वाडा यालाच गढी असे म्हणतात. औसाच्या भुईकोट किल्ल्यासाठी गढी असा शब्द वापरलेला आहे[२]. सरदार जहागिरदार, सरदेशमुख, सरदेशपांडे, देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी अथवा कुलकर्णी हे अधिकारी किंवा सरकारचे प्रतिनिधी स्वतः साठी अशा गढ्या उभारीत असत[३] .गढीची रचना म्हणजेच चार कोपऱ्याला चार बुरुज अथवा त्यापेक्षा जास्त बुरुज असून या दगड मातीपासून उभारलेल्या बुरुजांना जोडणाऱ्या उंच उंच व रुंद अश्या फांझी अथवा भिंती व त्याच्या आत असलेला सर्व सोईनीयुक्त वाडा यालाच ढोबळमानाने गढी असे म्हणता येईल. गढीचा वाडा म्हणजे भुईकोट किल्ल्याची प्रतिकृतीच होय. गढीला प्रामुख्याने गढीवाडा असाच शब्द रूढ आहे. पुणे नगरातील शनिवारवाडा म्हणजेच गढीवाडा होय.

किंबहुना तो भुईकोट किल्ले वजा असूनही त्याला वाडा हे नामाभिधान दिले आहे[४]. किल्ल्याचे प्रतिरूप म्हणजे गढी अथवा स्त्रीरूप म्हणजे गढी असाही अर्थबोध होतो. किल्ल्यात राजा अथवा सरदार किंवा किल्लेदार राहत असे. तो त्या प्रदेशाचा स्वामी असे. परंतु गढीतील अधिकारी, स्थानिक अधिकारी अथवा अनेक गावाचा वतनदार किंवा राजाचा प्रतिनिधी दिसतो.

प्रत्येक अधिकाऱ्याने अथवा वतनदाराने आपल्या सुलतानाचे अनुकरण करून आप आपल्या ऐपतीनुसार किल्ले वजा गढीवाडे उभारले. या वास्तू उभारण्यासाठी निवडलेली योग्य जागा व पाण्याचे सानिध्य यावरून त्या काळातील लोकांना भूगोलाचे ज्ञान असल्याचे स्पष्ट होते. याच बरोबर या वास्तू उभारीत असताना त्या काळातील काही समजुती रूढ होत्या. वास्तू वर चढावी त्या कोणतीच बाधा येऊ नये म्हणून अथवा अतिअमाणुशी शक्तींना प्रसन्न करण्यासाठी नर बळी देण्याची प्रथा रूढ झाली होती. पुढे तिचे रूपांतर बोकड, मेंढी व रेडा हे प्राणी बळी देण्यात झाले. हे संशोधांनांती आढळून आले आहे .

सरदार, जहागीरदार, सुभेदार, सरदेसाई, देशमुख, देशपांडे, पाटील, पटवारी, कुलकर्णी या वतनदारांनी वतनाच्या गावी पद, प्रतिष्ठा आणि ऐपतीनुसार गढीचे वाडे उभारलेले दिसतात.

गढीवाडे उभारणीचा उद्देश :-

मोठमोठे गढीवाडे उभारण्यामागे या वास्तूच्या मालकांचे अनेक उद्देश होते. ते उद्देश पुढीलप्रमाणे आहेत.

१. हिंस्त्र वन्य पशुपासून स्वतः चे व कुटूंबाचे तसेच वेळप्रसंगी गावकऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी.[5]
२. थंडी, ऊन, वारा, पाऊस या नसर्गिक आप्पतीपासून स्वतः चे व कुटूंबाचे तसेच वेळप्रसंगी गावकऱ्यांचा बचाव करण्यासाठी.
३. शत्रू व चोर, दरोडेखोरांपासून कुटूंबाचा व धनसंपत्तीचा बचाव करण्यासाठी.
४. पदाची प्रतिष्ठा उंचावण्यासाठी.
५. प्रजाजनांवर धाक निर्माण करण्यासाठी.
६. श्रीमंतीचे व वैभवाचे प्रदर्शन कारण्यासाठी.
७. शान, शोक व चैनीने राहण्यासाठी
८. अधिकाऱ्यांनी तसेच वतनदारांनी धान्याचा व पैशाच्या स्वरूपात गोळा केलेला महसूल साठवून ठेवण्यासाठी मोठमोठे गढीवाडे उभारले.

वरील उद्धेश्यसाठी मराठवाड्यात अशा प्रकारचे गढीवाडे उभारल्याचे आढळून येते.

वतन व वतनदार :-

गावाकरिता किंवा देशा करीता करीत असलेल्या सेवेबद्दल एखाद्या व्यक्तीला त्याचा उपजीविकेकरिता, मान मारताब राखण्यासाठी आणि जनतेने दिलेले व वंशपरंपरेने चालणारे उत्पन्न म्हणजे वतन व त्या वतनाचा मालक म्हणजे वतनदार होय. उत्पन्न शाश्वती हि वतनदार पद्धतीतील मूलभूत कल्पना आहे[6]

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

ग्रामचा कारभार नीटपणे चालावा म्हणून प्रचीन काळी राजकर्त्यांनी या वतन संस्थेस मान्यता दिली आणि राजे हि आपल्या मर्जीतील व्यक्तींना वतने देऊ लागली.

त्या वतनदारांनी आपल्या ऐपतीनुसार गढीवाडे उभारले.

पाटील :-

गाव वसविणारा पुढारी गावाचा पाटील झाला. म्हणून गावात पाटीलांचे घराणे प्रमुख असून गावात मानाने सर्वात वडील असावयाचे. जो गावाची बाजू सावरून उचलून धरणारा व गावाला घेऊन चालणारा म्हणून रयतेला पटला आणि सरकारी काम महसूल वसूल, बंदोबस्त बिनभोबाट करणारा म्हणून सरकारला पटला तो गावाचा पाटील केला[७]. त्याने पुढे आपल्या उत्पन्नच्या ऐपतीनुसार व प्रतिष्ठतेनुसार गढीवाडा बांधला.

गढीवाडे उभारणीचा कालखंड :-

गढीवाडे उभारणीचा कालखंड हा एकाच वेळेसचा नसून तो वेगवेगळा संभवतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्र ग्रंथात २४ व २५ व्या अध्यायात दुर्ग रचनेचा उल्लेख मिळतो. तसेच १२ व्या शतकापर्यंत दुर्गाचे नऊ प्रकार प्रचलित होते. एकंदरीत इ. स. पूर्व काळापासून भारतीयांना दुर्गाची कल्पना होती. कल्याणचे चालुक्य, देवगिरीचे यादव व त्यानंतर बहामनी राजवटीत किल्ले उभारणी व त्यात अनेक सुधारणा केल्या आणि किल्ल्याला भक्कमपणा आणला असा उल्लेख तारीख - ए - उदगीर या जुशहा जंग[८]. याने लिहिलेल्या ग्रंथात मिळतो. मराठवाड्यातील औसा किल्ला हा बहामनी सत्येचा मुख्य वजीर महमूद गवान९. याने बांधला. वरील विवेचनावरून स्पष्ट होते कि किल्ल्यांचा व त्या नंतर गढीवाड्यांचा उत्तरोत्तर विकास होत गेला. मराठवाड्यात हैद्राबादच्या निजाम सत्तेच्या काळात गढीवाड्याची निर्मिती झपाट्याने झाल्याचे दिसून येते[10]

मराठवाड्यातील हे मध्यकालीन गढीवाडे आज अस्तीत्वात असले तरी त्यांची स्थिती मात्र आज नीट राहिलेली नाही. मराठवाडा निजाम सत्याखालून १७ सप्टेंबर १९४८ साली मुक्त झाला. निजाम सत्येच्या शेवटाबरोबरच या स्थानिक वतनदारांच्या सत्ता संपुष्टत आल्या. त्यामुळे या गढीवाड्याचे व त्यांचा मालकांचे वैभव, दरारा संपल्याचे दिसते. हे गढीवाडे आज शेवटची घटका मोजीत आहेत. तसेच बरेच गढीवाडे नष्ट झालेले आहेत.

निष्कर्ष :-

१. मध्ययुगीन कालखंडात मराठवाड्यात सरंजामशाही अस्तीत्वात होती.

२. सुलतान किल्ल्यामध्ये महाल बांधून वास्तव करीत होते असे दिसते.

३. निजामाचे अनुकरण सरदार, जहागीरदार व वतनदारानी करून आपल्या वतनाच्या गावी गढीवाडे उभारलेले दिसतात.

४. वतनदारी पद्धत वंश परंपरागत असलेली दिसते.

OUR HERITAGE
ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11
Impact Factor (2020) - 6.8

५. पाटील, पटवारी, देशमुख, देशपांडे, इ. वतनदारांना गावात मान होता.

६. वतनदार राजाचे गाव प्रतिनिधी होते.

७. पाटील व देशमुख हे वतन मराठवाड्यात प्रामुख्याने मराठा जातीच्या व्यक्तीकडे असलेले आढळून आलेले आहे . तर कुलकर्णी व देशपांडे हे वतन अथवा पद प्रामुख्याने ब्राह्मण जातीकडे असलेले दिसते.

८. गावात सुव्यवस्था व शांतता ठेवण्याचे काम पोलीस पाटील करीत असे.

९. महसूल गोळा करण्याचे काम महाली पाटीलकडे असल्याचे दिसते.

१०.१७ सप्टेंबर १९४८ ला निजाम सत्तेचा शेवट घडून आल्यानंतर मराठवाड्यातील वतनदारीचा शेवट झालेला दिसतो.

संदर्भ :-

१. कै. आपटे वा. गो. मराठी शब्दरत्नाकर, सरस्वती ग्रंथ भांडार पुणे -२, १९९९ पृष्ठ १३८.
२. Maharashtra State Gazetteers History Part II- Mediaeval Period, Bombay, 1972, PP.192
३. ३. लातूर जिल्हा गॅझे. भाग २, महाराष्ट्र शासन दार्शनिक विभाग, मुंबई - २००८- पृ . २३९.
४. ४. डॉ. खांडगे मंदा, वैभव पेशवेकालीन वाडयाचे, साई प्रकाशन, पुणे - ३७, २००२, पृ . २१२
५. ५. श्रीमती एकताटे उषाताई, नांदेड जिल्हातील गढी व वाडे एक अभ्यास, भारतीय इतिहास संकलन समिती, महाराष्ट्र, पुणे, २००३, पृ . १६
६. ६. तर्कतीर्थ श्री जोशी लक्ष्मणशास्त्री (संपा.) मराठी विश्वकोश, खंड १५ महाराष्ट्र राज्य, मराठी विश्वकोश मंडळ, मुंबई. १९९५ पृ . ९७७
७. ७. प्रा. कठारे अनिल, मराठे कालीन पाटील, पूनम प्रकाशन, कंधार, १९९६, पृ . १६
८. ८. डॉ. कठारे व डॉ. पवार मराठवाड्यतील किल्ले अल्फा पब्लिकेशन, नांदेड, २००८, पृ. ९३
९. ९. पुरी सुनील औसा: एक मध्ययुगीन नगर आणि किल्ला, अप्रकाशित एम. फिल. प्रबंध. डॉ. बा. आं. म. वि. औरंगाबाद . १९९६, पृ . १९
१०. १०. प्रा. सूर्यवंशी एन. बी., लातूर जिल्हातील गढी व वाड्यांचा चिकित्सक अभ्यास, अप्रकाशित पीएच. डी. प्रबंध, स्वा. रा. ती म. वि. नांदेड २०१०पृ . ११८